महाराष्ट्र शासन

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८

संकेतस्थळ: http:/www.dmer.org

क्र.एनयुआर/अधिपरिचारीका/निवडपत्र/शिफारसपत्र/ई/५/२०१५ दिनांक:-२६/०६/२०१५

## "नोटीफिकेशन"

## अधिपरिचारीकांची (एमएचएन-सीडब्ल्युटी-२०१४) भरती

या संचालनालयाच्या अधिनस्त रुग्णालयामध्ये अधिपरिचारीकांची मंजुर तिसऱ्या टप्प्यातील पदे भरण्याकरीता दिनांक ०१ फेब्रुवारी,२०१५ रोजी स्पर्धापरीक्षा घेण्यांत आली होती. सदर स्पर्धा परीक्षेचा निकाल दिनांक ०६ फेबुवारी,२०१५ रोजी जाहीर करण्यांत येऊन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यांत आली होती. सदर गुणवत्ता यादीनुसार अधिपरिचारीका पदाची ५०० उमेदवारांची निवड यादी (प्रथम फेरी) या संचालनालयाच्या संकेतस्थळावर दिनांक २०/०४/२०१५ रोजी जाहिर करण्यात आली होती.सदर यादी जाहीर करतांना तत्कालीन संस्थेतील रिक्त पदांचा पदस्थापनेसाठी प्राधान्याने विचार करण्यात आला होता. परंतु शासनाकडून बदलीचे आदेश संचालनालयास प्राप्त झाल्यानंतर तसेच सदर बदलीचे आदेश संचालनालयामार्फत निर्गमित झाल्यानंतर निवड झालेल्या उमेदवारांना रिक्त झालेल्या पदावर पदस्थापना देण्याचे निर्देश देण्यात आले होते. तोपर्यंत नियुक्ती आदेश स्थगित करण्यात आले होते. शासनाकडून बदलीचे आदेश प्राप्त झालेले असून या संचालनालयाने सर्व बदलीचे आदेश निर्गमित केले आहेत. सदर बदली आदेशानंतर रिक्त पदांच्या संख्येत बहुतेक सर्व संस्थामध्ये बदल झालेला आहे. त्यामुळे निवड झालेल्या ५०० उमेदवारांच्या पदस्थापनेच्या संस्थेमध्ये बदल होत आहे.

निवड केलेली प्रथम फेरीतील ५०० उमेदवारांची पदस्थापनेची यादी रदद् करुन मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे समाविष्ठ केलेल्या उमेदावरांपैकी गुणवत्तेनुसार ४ उमेदवारांची निवड झाल्यामुळे ५०४ उमेदवारांची पदस्थापनेची यादी या संचालनालयाच्या संकेतस्थळावर दिनांक २७/०६/२०१५ रोजी सायंकाळी ६ वाजता जाहिर करण्यात येईल. त्यानुसार प्रथम फेरीत निवड झालेल्या ५०४ उमेदवारांना दिनांक २९/०६/२०१५ रोजी नियुक्ती आदेश टपालाद्वारे निर्गमित करण्यात येतील.

संचालक

वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई

प्रत :-

१)मा.अपर मुख्य सचिव, वैद्य.शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,गो.ते.रुग्णालय,आवर,मुंबई